आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.२० वाजता
११ मे २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- ऑपरेशन सिंदूरमधे १०० पेक्षा जास्त दहशतवादी, तर पाकिस्तानच्या कुरापतींवर प्रत्युत्तरादाखल केलेल्या कारवाईत पाकिस्तानचे ३५ ते ४० जवान ठार झाल्याचं संरक्षण दलांकडून स्पष्ट

- पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतरची शस्त्रसंधी या मुद्द्यांवर संसदेचं विशेष अधिवेशन बोलवायची विरोधकांची मागणी

- चीनमध्ये शांघाय इथं आयोजित तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत तिरंदाज दीपिका कुमारी आणि पार्थ साळुंखे यांची कांस्यपदकाची कमाई

**आणि**

- महिला क्रिकेटमधे, एकदिवसीय तिरंगी मालिकेत अंतिम सामन्यात श्रीलंकेवर ९७ धावांनी मात करत भारतानं करंडक पटकावला

**<><><><><>**

पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानं ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातल्या दहशतवादी तळांवर केलेल्या हल्ल्यात १०० पेक्षा जास्त दहशतवादी ठार झाल्याची माहिती भारताच्या तिन्ही सैन्यदलांच्या प्रतिनिधींनी आज दिली. याविषयी ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून..

**होल्ड - व्हॉईस कास्ट- अंकिता**

(लष्करी कारवाई महासंचालक लेफ्टनंट जनरल राजीव घई, हवाई कारवाई महासंचालक एअर मार्शल ए. के. भारती आणि नौदल कारवाई महासंचालक व्हाइस ॲडमिरल ए. एन. प्रमोद यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत देऊन भारताच्या हवाई हल्ल्याविषयी आणि त्यानंतरच्या घटनाक्रमाविषयीचे तपशील समोर ठेवले.

ठार झालेल्या दहशतवाद्यांमध्ये कुख्यात दहशतवादी युसुफ अजहर, अब्दुल मलिक रौफ, मुदस्सिर अहमद यांचाही समावेश असल्याचं त्यांनी सांगितलं. ऑपरेशन सिंदूरचा उद्देश पाकिस्तानातले दहशतवादी तळ उद्ध्वस्त करणं हाच होता, ही बाब भारताच्या तिन्ही सैन्यदलांच्या प्रतिनिधींनी अधोरेखित केली. या हल्ल्यानंतर पाकिस्तानकडून नियंत्रण रेषेजवळ वारंवार झालेला गोळीबार, भारताच्या हद्दीत आलेले असंख्य ड्रोन्स, इतर

तत्सम यंत्रं यामुळे भारतानं स्वसंरक्षणासाठी आणि प्रत्युत्तरादाखल पाकिस्तानच्या सशस्त्र दलांच्या तळांना लक्ष्य केलं असून या कारवाईत पाकिस्तानचे ३५ ते ४० जवान मृत्युमुखी पडल्याचंही त्यांनी सांगितलं. काल संध्याकाळी दोन्ही देशांमध्ये झालेल्या शस्त्रसंधीनंतर काही तासांतच पाकिस्ताननं पुन्हा सीमेपलीकडून गोळीबार केल्याचं उल्लेख करून, या पार्श्वभूमीवर लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांनी परिस्थितीचा आढावा घेतला असून पाकिस्ताननं पुन्हा शस्त्रसंधीचं उल्लंघन केल्यास त्याला चोख प्रत्युत्तर द्यायचं पूर्ण स्वातंत्र्य लष्कराला दिलं असल्याचंही लष्करी कारवाईचे महासंचालक लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी सांगितलं. भारतानं आत्तापर्यंत केलेल्या कोणत्याही कारवाईचा उद्देश पाकिस्तानी सशस्त्र दलांना किंवा नागरिकांना लक्ष्य करणं हा नव्हता, तर तिथले दहशतवादी तळ उद्ध्वस्त करणं हेच भारताचं लक्ष्य होतं, यावर या तिन्ही अधिकाऱ्यांनी भर दिला.)

**<><><><><>**

भारतानं ऑपरेशन सिंदूर अंतर्गत केलेली कारवाई म्हणजे भारताच्या राजकीय, सामाजिक आणि धोरणात्मक इच्छाशक्तीचं तसंच आणि लष्करी सामर्थ्य आणि निर्धारचं प्रतिक आहे असं केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. राजनाथ सिंह यांनी आज दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून लखनऊ इथल्या ब्राम्होस एकात्मिकरण आणि चाचणी सुविधा केंद्राचं उद्घाटन केलं. त्यावेळी ते बोलत होते. हा प्रकल्प म्हणजे भारतानं संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेच्या दिशेनं टाकलेलं मोठं पाऊल आहे आणि यामुळे भारताची ताकद वाढेल असं ते म्हणाले. ब्रह्मोस हे केवळ शस्त्र नाही तर ते, शत्रूला भारतीय सशस्त्र दलांच्या सामर्थ्याचा इशारा देणारं आणि सीमांचं रक्षण करण्याच्या वचनबद्धतेचा संदेश आहे असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पाकिस्तानबरोबर शस्त्रसंधी जाहीर केल्यानंतर आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतल्या निवासस्थानी महत्त्वाची बैठक घेतली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग तसंच तिन्ही सेनादलांचे प्रमुख बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतरचा युद्धविराम या मुद्द्यांवर संसदेचं विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी विरोधकांनी केली आहे.

काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्यसभेतले विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी तसं पत्र प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना लिहीलं आहे. या मुद्यांवर व्यापक चर्चा होणं आवश्यक असल्याचं मत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी व्यक्त केलं आहे. भारत पाकिस्तान दरम्यान शस्त्रसंधीची घोषणा सर्वप्रथम अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी समाजमाध्यमांवर केली, तसंच अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी तटस्थ मंचाचा उल्लेख केला, या विषयी त्यांनी आक्षेप घेतला असून सिमला करार डावलला तर जात नाही ना? असा प्रश्न उपस्थित केला आहे.

**<><><><><>**

चीनमध्ये शांघाय इथं आयोजित तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत तिरंदाज दीपिका कुमारी आणि पार्थ साळुंखे यांनी कांस्यपदकाची कमाई केली. दीपिकाने टोकियो ऑलिंपिक संघाच्या सुवर्णपदक विजेत्या कोरियाच्या कांग चाययुंगचा ७-३ असा पराभव केला. तर पार्थ साळुंखे याने पॅरिस ऑलिंपिक पदक विजेत्या फ्रान्सच्या बॅप्टिस्ट एडिसचा ६-४ असा पराभव केला. शांघाय तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारताने दोन सुवर्ण, १ रौप्य आणि ४ कांस्य पदकांसह एकूण सात पदकांची कमाई केली आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे, एकदिवसीय तिरंगी मालिकेत आज कोलंबो इथं झालेल्या अंतिम सामन्यात भारतानं श्रीलंकेवर ९७ धावांनी मात केली आणि करंडक पटकावला.

भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला, आणि निर्धारित ५० षटकात ७ गड्यांच्या मोबदल्यात ३४२ धावा केल्या. त्यात स्मृती मंधानानं १०१ चेंडूत ११६ धावा करून मोलाचं योगदान दिलं. एकदिवसीय क्रिकेटमधलं तिचं हे अकरावं शतक होतं. एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं

करणारी ती तिसरी महिला क्रिकेटपटू ठरली आहे. स्मृती या सामन्यातली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेचा डाव सामन्यातले १० चेंडू बाकी असतानाच २४५ धावांवर आटोपला.

भारतातर्फे स्नेह राणानं ४, तर अमनज्योत कौरनं ३ बळी मिळवले. या मालिकेत एकूण १५ बळी मिळवत स्नेह राणा मालिकेतली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

<><><><><>

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आघाडी कायम ठेवत ७५ पदकांची कमाई केली आहे. यात २८ सुवर्ण, २२ रौप्य आणि २५ कास्य पदकांचा समावेश आहे. त्यातही सर्वाधिक २९ पदकं पोहण्याच्या स्पर्धेत मिळाली असून त्यात ७ सुवर्ण पदकांचा समावेश आहे. त्याखालोखाल तिरंदाजी, नेमबाजी, सायकलिंक, भारोत्तोलन, मल्लखांब, टेबलटेनिस आणि खो-खो या खेळांचा समावेश आहे. महाराष्ट्राखालोखाल १४ सुवर्ण पदकांसह ३९ पदकं मिळवून कर्नाटक दुसऱ्या स्थानावर तर राजस्थान २३ पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

खेलो इंडिया स्पर्धेत सर्व खेळाडू चमकदार कामगिरी करत असून जलतरणात अदिती हेगडे, भारोत्तोलनात हर्षवर्धन साहू आणि धनुर्विद्येत तेजस साळवेनं आज उत्तम खेळाचं प्रदर्शन केलं. महाराष्ट्राच्या अस्मिता ढोणेने आज मुलींच्या ४९ किलो वजनी गटात नवा विक्रम प्रस्थापित केला. अस्मितानं क्लीन अँड जर्क प्रकारात ९५ किलो आणि एकूण १७० किलो वजन उचललं आणि सुवर्णपदकाला गवसणी घातली.

आज झालेल्या कबड्डी स्पर्धेत मात्र हरयाणा संघानं महाराष्ट्राच्या संघाला ३९-२८ च्या फरकानं हरवलं.

<><><><><>

उद्या बुद्धपोर्णिमा. त्यानिमित्त राष्ट्रपती द्रौपद्री मुर्मू यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. भगवान बुद्धांनी समोर ठेवलेल्या आदर्शांमुळे समानता, बंधुभाव आणि सामजिक न्यायाच्या तत्वांवरचा विश्वास दृढ होतो, असं राष्ट्रपतींनी त्यांच्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशाच्या सीमाभागात सुरू असलेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इन्स्टिटट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंन्टट्स ऑफ इंडिया या संस्थेनं आपल्या पुढं ढकललेल्या परीक्षांचं नवीन वेळापत्रक जाहीर केलं आहे. सीए फायनल, इंटरमिडिएट, पोस्ट क्वालिफिकेशन कोर्स आणि सेल्फ पेस्ड ऑनलाईन मोड्युल या परीक्षा आता १६ मेपासून सुरू होणार आहेत. सुधारित वेळापत्रकाचे तपशील इन्स्टिटट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंन्टट्स ऑफ इंडियाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**<><><><><>**

नासा आणि इस्त्रो यांनी संयुक्तपणे विकसित केलेला सिंथेटिक ऍप्रोच रडार उपग्रह पुढच्या महिन्यात प्रक्षेपित केला जाण्याची शक्यता आहे. इस्त्रोचे अध्यक्ष डॉ व्ही नारायणन यांनी आज इंफाळमधल्या केंद्रीय कृषी विद्यापीठाच्या पाचव्या दीक्षांत समारंभात बोलताना ही माहिती दिली.

**//<><><><><>//**